# पुणे महानगरपालिका

## जाहिरात प्रकटन

**पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदांसाठी निवडयादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.**

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी पे बॅण्ड | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य प्रमुख वर्ग-अ | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० + (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | उमेदवार हा बॉम्बे मेडिकल ॲक्ट ६(सन १९९२) अन्वये नोंदविण्यात येणारी आरोग्य विषयक पदवी असलेला आणि शिवाय,<br>अ) भारतीय किंवा विदेशिय विश्व विद्यालयाचा अथवा रॉयल कॉलेज ऑफ फिजीशियन आणि सर्जनचा सार्वजनिक आरोग्य विषयक पदविका (डिप्लोमा)<br>**अथवा**<br>ब) भारतीय किंवा विदेशिय विश्व विद्यालयाची डॉक्टर ऑफ मेडिसिन (स्टेट मेडिसिन), डॉक्टर ऑफ सायन्स (पब्लिक हेल्थ), बॅचलर, डॉक्टर अथवा मास्टर ऑफ सायन्स यापैकी एख ादी पदवी असलेला पाहीजे. शिवाय त्याला एकाद्या उत्तरदायित्वाच्या (रिस्पॉन्सिबल) आरोग्य विषयक जागेवर कमीत कमी पाच वर्ष काम केल्याचा अनुभव असला पाहीजे. | १ | संभाव्या रिक्त १ - (खुला) | आरोग्य कार्यालय |
| २ | सांख्यिकी व संगणक प्रमुख (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० + (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | १) मान्य विद्यापीठाची शास्त्र शाखेकडील संख्या शास्त्र विषय घेऊन किमान द्वितीय श्रेणीतील पदवीधारक.<br>२) सरकारमान्य तांत्रिक प्रशिक्षण संस्था किंवा विद्यापीठ यांचेकडील कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मधील पदव्युत्तर पदवी/पदविकाधारक.<br>३) संगणक क्षेत्रातील सांख्यिंकी कामाचा शासकीय, निमशासकीय अथवा खासगी संस्थेमधील कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.<br>(अपंग उमेदवारास प्राधान्य) | १ | निवडयादी १- खुला | **सांख्यिकी व संगणक विभाग** |
| ३ | डायरेक्टर (झू) (वर्ग अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० + (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | १) एम. व्ही. एस्सी.<br>२) किमान १० वर्षाचा प्राणी संग्रहालया-मधील कामाचा अनुभव<br>किंवा<br>वन्य प्राणी देखभालीबाबत भारतीय अथवा परदेशातील विद्यापीठाची पदवी व किमान १० वर्षाचा अनुभव<br>किंवा<br>वन खात्याकडील असिस्टंट कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट दर्जाचा अधिकारी | १ | निवडयादी १- खुला | **उद्यान विभाग** |
| ४ | उप आरोग्य प्रमुख (वर्ग-अ) | पे बॅण्ड १५६०० ते ३९१०० + (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | १) मान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस.पदवी व डिप्लोमा इन पब्लीक हेल्थ पदविका उत्तीर्ण.<br>२) प्रशासकीय कामाचा विशेषत: सहायक आरोग्य प्रमुख या पदाचा कमीत कमी ४ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**३) पुणे म.न.पा.तील [illegible] प्राधान्य दिले जाईल.** | १ | निवड यादी अ.ज. -१. | **आरोग्य कार्यालय** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रकल्प संचालक (प्रोजेक्ट डायरेक्टर नागरवस्ती विकास योजना) (वर्ग-अ) | रु. १५६०० ते ३९१०० + (ग्रेड पे+ मान्य भत्ते+मोटार कार भत्ता) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण. ब) अर्बन कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोजेक्टमध्ये प्रकल्प अधिकारी म्हणून २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. (अपंग उमेदवारास प्राधान्य) | १ | **निवडयादी** १- खुला | नागरवस्ती विकास योजना कार्यालय |
| ६ | कामगार कल्याण अधिकारी (वर्ग-ब) | रु. ९३०० ते ३४८०० + (ग्रेड पे+ मान्य भत्ते) | मान्य विद्यापिठाचा पदवीधर आणि सरकारमान्य लेबर वेल्फेअरचा डिप्लोमा संपादन केलेला. इतर पात्रता:- मनपाच्या कार्यालयीन कामकाजाचा किमान पाच वर्षाचा अनुभव (अपंग उमेदवारास प्राधान्य) | १ | **निवडयादी** १ - खुला | सल्लागार (कामगार) कार्यालय |
| ७ | आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी (वर्ग-ब) | रु. ९३०० ते ३४८०० + (ग्रेड पे + मान्य भत्ते) | बी. ए. एम. अॅण्ड एस. उत्तीर्ण (१-अपंग उमेदवारास प्राधान्य) | ५ | **निवडयादी** ४ - खुला १ - विमाप्र | आरोग्य कार्यालय |

**अटी:-**

१) <u>**वयोमर्यादा**</u> :-

(अ) जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम राहील).

(ब) माजी सैनिक, अपंग व प्रकल्पग्रस्त/भूकंपप्रगस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. (माजी सैनिक, अपंग व प्रकल्पग्रस्त/भूकंपप्रगस्त असलेबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.)

(क) स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू यांना ५ वर्ष शिथीलक्षम व जनगणना अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

(ड) पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागू होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्म तारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

३) अर्जामध्ये अपंग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक याचा स्पष्ट उल्लेख करावा.

४) उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.

५) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.

६) उपरोक्त पदापैकी आवश्यकता असलेल्या पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व वेळोवेळी प्रसृत शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

७) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

८) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता-गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.

१०) शासन निर्णय क्र. बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ अन्वये मागासवर्गीय गटातील उमेदवारांना नियुक्तिपुर्वी पुणे महानगरपालिकेकडे जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) व नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

११) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१२) उमेदवार सरकारी/निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

१३) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१४) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१५) अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (शासन मान्य)

१६) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्त समाप्त करण्यात येईल.

१७) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२, दि.१/७/२००५ नुसार दि.२८/३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१८) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसुचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१/ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदीनुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजा(अ), भज(ब), भज(क), भज(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. त्यानुसार या प्रवर्गातील उमेदवारांनी जात व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

१९) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका हे स्वत:कडे राखून ठेवीत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२०) **मागसवर्गीय उमेदवारांना रु.५०/- व खुल्या गटातील उमेदवारांना रु. १००/- किंमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा.महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली सेवकवर्ग विभाग कार्यालय, रुम नं. २४०, दुसरा मजला, पुणे मनपा, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे ५ येथे दि. १५/०६/२०११ ते दि.२९/०६/२०११ अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.३०/०६/२०११ दुपारी ४.०० पर्यंत सेवकवर्ग विभाग कार्यालय, रुम नं. २४०, दुसरा मजला, पुणे मनपा, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे ५ येथे स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

सही /-
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका